# दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १०३०/२०२४ नि. क्र. १ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी कलम ८ अन्वये बॉम्बे रेग्युलेशन नुसार वारसा दाखला मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत कामातील मयत **सिकंदर कासीम पटेल** हे दि.३१/१०/२०१७ मयत झाल्याचे आढळून येत आहे. प्रस्तुत अर्जदार हा मयत सिकंदर कासीम पटेल यांचा मुलगा असून त्यांनी त्यांचे **आडनाव शेख** असे नमूद केले आहे. परंतु उर्वरित वारसांपैकी मयताच्या मुलांची आडनावे पटेल अशी आहेत. त्यामुळे अर्जदार यांचे आडनाव शेख असल्याबाबतचे व ते मयत **सिकंदर कासीम पटेल यांचेच वारस असल्याबाबतच्या** खात्रीकरिता आवश्यक कागदपत्रे अभिलेखावर दाखल केल्याचे दिसून येत नाहीत. तरी अर्जदार यांचे **आडनाव पटेल वरून शेख केल्याबाबतचे गॅझेट अथवा संबंधित कागदपत्रे दाखल करावीत**. याबाबत अर्जदार यांनी पुर्तता करून युक्तीवाद करावा.

उदगीर
दि.०६/०३/२०२६

**(के. ए. यादव)**
२ रे दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
उदगीर